**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २३/२०१७-१८/२९५ दिनांक: १२.१०.२०१७

## आदेश
## आदेश केस क्र. २३/२०१७-२०१८

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. अर्जुन केरबा पाटील<br>गट क्र.७४५ मु.बारवे ता भुदरगड जि.कोल्हापूर<br>पत्ता:- मु.पो.गणेशनगर बांबवडे<br>ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर | : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | | **विरुध्द पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर | | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग गारगोटी | | |

**कोरम:-** १. श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## निर्णय

मी प्र.वि.खपली सदस्य सचिव, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

१) श्री अर्जुन केरबा पाटील मु.पो. गणेशनगर बांबवडे यांनी त्यांच्या मु.पो. बारवे येथील शेतात महावितरणने एक नविन खांब तीन आंब्याच्या झाडाच्या मध्ये रोवला असून त्यामुळे माझे नुकसान झाले आहे आणि भविष्यात मला झाडा पासून मिळणारे रु. २,५,०००००/- मिळणार नाहीत . तरी मला न विचारता उभारलेला हा खांब काढून टाकावा किंवा मला मी मागणी केलेली नुकसान भरपाई मिळावी असा अर्ज या मंचाकडे केला आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांनी ग्राहकांची खांब स्थलांतर करण्याची मागणी फेटाळल्यामुळे त्यांनी या मंचाकडे अर्ज केला आहे.

## वि. प. यांची भूमिका.

२) मंचासमोर आज श्री एस.एस.गायकवाड शाखा अभियंता पिंपळगांव ता. भुदरगड श्री आर.के. नेर्लेकर प्रभारी उपकार्यकारी अभियंता गारगोटी उपविभाग श्री एस.के. पोवार अतिरिक्त कार्यकारी अभियंता, ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर हे हजर होते. उपकार्यकारी अभियंता उपाविभाग गारगोटी यांनी मंचास पाठविलेल्या लेखी उत्तरामध्ये श्री अर्जुन केंरबा पाटील यांचे शेतामध्ये गट क्र. ७४५ मु.पो. बारवे मधून जाणारी लघुदाब विद्युत वाहिनी श्री मारुती दिनकर पाटील यांचे ५ अश्वशक्तीचे विज जोडणी टाकण्याचे आणि सदर कामासाठी करिता टॅपिंग पोल सिमेंट पोल ८ मिटरचा असून त्यावरुन पुढील ५ खांब आलेले आहेत यातील पहिला खांब श्री पाटील यांच्या आंब्याच्या झाडाजवळ आलेला आहे. भौगोलिक परिस्थितीमुळे सदर वाहिनी रस्त्याच्या कडेला घेता आली नाही. असे म्हटलेले आहे. जर हा खांब स्थलांतरीत करायचा असेल तर येणारा खर्च श्री अर्जुन के. पाटील यांनी करावा असे म्हटले आहे. प्रत्यक्ष चर्चे दरम्यान सदर खांब टाकतेवळी तक्रारदार याना कोणतीच पूर्व सूचना देण्यात आलेली नव्हती. श्री पाटील अगर महावितरणचे जबाबदार अधिकारी तेथे उपस्थित नव्हते हे मंचाच्या निदर्शनास आले आहे. सदर वाहिनी कार्यान्वीत करण्याचे पत्र दिनांक १४.०४.२०१६ रोजी प्राप्त झाले असले तरी अद्याप सदरची कार्यवाही अपुरी आहे. त्यामुळे ग्राहकाच्या मागणीचा विचार करता येईल असे अधिकारी यांनी मंचास सूचित केले आहे. या सर्व विषयावर सखोल चर्चा करुन सर्व कागदपत्राचे वाचन केले असता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार विद्युत खांब स्थलांतरणांची मागणी मान्य करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## कारणमिमांसा

३) विद्युत कायदा २००३ आणि त्यातील इतर तरतुदीनुसार ग्राहकास सदर खांब उभारणे पूर्वी कल्पना देणे आवश्यक होते. सदर खांब उभारणीचे वेळी ही बाब ग्राहकाच्या लक्षात येताच ग्राहकाने दिनांक २३.०६.२०१६ ला लेखी अर्ज दिला त्यानंतर पुन्हा दि. २८.१२.२०१६ ला दुसरा अर्ज दिला दोन्ही लेखी अर्जा पूर्वी तोंडीही कल्पना दिली होती. पण महावितरणने याची दखल घेतली नाही. प्रत्यक्ष चर्चे वेळी सिमेंट खांबाची उभारणी आणि झाडाची स्थिती याचा फोटोही पहाण्यात आला अधिका-यानी खांबाचे डिझाईन ड्राईग ही दाखविले.

४) मा. मंचासमोर चर्चा आणि प्रत्यक्ष सर्व कागदपत्रे पाहून असे लक्षात आले की, सध्या हा खांब इतरत्र हलविणे शक्य होणार आहे. त्याची तोशीस ग्राहकास अगर महावितरणला लागणार नाही.

५) महावितरण संबंधीत विभागाने पूर्ण दक्षता घेऊन ग्राहकास पूर्व कल्पना देऊन सदरचा सिमेंट खांब हलवून ग्राहकाचे होणारे नुकसान टाळावे. असे मंचासमोर मान्य करण्यात आले.

## आदेश

१) योग्य ठिकाणी संबंधीत सिमेंट खांब हालविण्याची कार्यवाही दि. १०.११.२०१७ पूर्वी कार्यान्वीत करावी.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण